अंबाजोगाई


ज्ञान-विज्ञान विमुक्तये

विद्यापीठ अनुदान आयोग,नवी दिल्ली पुरस्कृत

# "डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार"

## राष्ट्रीय चर्चासत्र

दि. ०४ ऑक्टोंबर २०१३



संयोजक

**इतिहास विभाग**

**श्री सिध्देश्वर महाविद्यालय,माजलगाव**

(कला,विज्ञान व वाणिज्य)

ता.माजलगाव जि.बीड ४३१ १३१ (महा.)

ISBN No.: 978-1-62951-322-5

RADHEYA PUBLICATION

Scanned by CamScanner

# -: अनुक्रमणिका :-


| अ.क्र. | शोधनिबंधाचे नाव | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ६१. | बी.आर.आंबेडकर व्हीव ऑन .... | डॉ.वाय.पी.सिंग | १७९ |
| ६२. | ईकॉनॉमिक थॉटस् ऑफ डॉ.बी.आर.आंबेडकर.... | प्रा.अजय एकनाथ अहिर | १८१ |
| ६३. | खोतीचा प्रश्न आणि जात सरंजामशाही | प्रा.बबन जगन्नाथराव झांजे | १८५ |
| ६४. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वर्णव्यवस्थे विषयी विचार | प्राचार्य डॉ.अशोक जी.साबने | १८८ |
| ६५. | अर्थतज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक.. | प्रा.संगीता वि.काळणे | १९१ |
| ६६. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार | प्रा.मुळे अविनाश बाबुराव<br>डॉ.एच.एन.जमाले | १९३ |
| ६७. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ...... | प्रा.शिंदे नारायण भर्तरीनाथ<br>डॉ.एस.बी.इंगोले | १९७ |
| ६८. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार | प्रा.सचिन उत्तमराव हंचाटे | २०० |
| ६९. | भारतीय महान अर्थतज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर | प्रा.परकाळ भागवत स. | २०३ |
| ७०. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर थॉट ऑन..... | प्रा.विठ्ठल बाबुराव गुंडे | २०५ |
| ७१. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार व .... | प्रा.बोडखे बालाजी रावसाहेब | २०८ |
| ७२. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार व कार्य | डोंबरे विजय तुकाराम | २१० |
| ७३. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मिक विचार | प्राचार्य डॉ.के.एम.पवार | २१३ |
| ७४. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मिक विचार व धम्म | प्रा.सचिन रमेश साळवे | २१७ |
| ७५. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक,धर्मिक विचार | प्रा.सौ.शिंगणे कल्पना भिमसिंग | २२० |
| ७६. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्म विषयक विचार | प्रा.डॉ.सुनिल रजपुत | २२३ |
| ७७. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची धर्म मिमांसा | प्रा.उपलंचवार श्रीकांत शंकर | २२६ |
| ७८. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धार्मिक विचार | प्रा.अंभोरे ए.जी. | २३० |
| ७९. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्म विषयक विचार | प्रा.डॉ.मधुकर धतुरे | २३४ |
| ८०. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मिक विचार | प्रा.घाडगे रघुनाथ व्यंकटी | २३७ |
| ८१. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक.. | प्रा.डॉ.सुर्यवंशी डी.व्ही. | २४० |
| ८२. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची कामगाराबाबतची भुमिका | प्रा.एस.जी.बेंजलवार | २४३ |
| ८३. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय कामगार चळवळ | प्रा.गाढेराव एस.बी. | २४६ |
| ८४. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक.... | प्रा.जे.डी.गोपाळ | २५० |
| ८५. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार विषयक विचार | प्रा.सुरेश कातळे | २५३ |
| ८६. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विचार | कु.ज्योति रामचंद्र सुरवसे | २५५ |
| ८७. | कामगारांचा मसिहा डॉ.बाबासाहेब आंबेडकर | प्रा.डॉ.एम.बी.वाघमारे | २५७ |
| ८८. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक विचार | प्रा.सिरसट पी.बी. | २६१ |
| ८९. | डॉ.बाबासाहेब यांचे कामगार विषयक विचार | बोटेवाड बालाजी गणपतराव<br>प्रा.बडोदकर एस.एस. | २६३ |
| ९०. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक विचार | प्रा.ए.एम.काळबांडे | २६६ |
| ९१. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार विषयक विचार | प्रा.मानवते यु.एच. | २६८ |
| ९२. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कामगारांच्या विषयीचे विचार.. | प्रा.जनार्दन श्रीकांत जाधव | २७० |
| ९३. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री खाण कामगारा..... | प्रा.डॉ.बी.के.शेप<br>प्रा.व्ही.जी.जगतकर | २७५ |
| ९४. | कामगार शोषणविरोधी आंबेडकरी तळमळ | प्रा.राजेश अनंतराव कांबळे | २७८ |
| ९५. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक विचार.. | सुदर्शन उध्दवराव स्वामी | २८२ |
| ९६. | डॉ.बी.आर.आंबेडकर व्हीव ऑन द...... | प्रा.सुतवने पी.ए. | २८४ |
| ९७. | कामगारांचा संप अधिकार : डॉ.आंबेडकरांची भूमिका | प्रा.डॉ.मोरे डी.ए. | २८६ |


Scanned by CamScanner

डॉ. एम. बी वाघमारे.
जुन्नर

# ८७ कामगारांचे 'मसिहा' डॉ. बाबासाहेब आंबेडकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कायदेपंडीत होते, अर्थतज्ञ होते. त्यांनी केलेल्या सामाजिक चळवळी त्यांचे धर्मविषयक धोरण अशा विविध अंगांनी अभ्यास केला तरी त्यांच्या जीवनातील फार मोठ्या योगदानाला अभ्यासकांनी स्पर्श केला नाही. ते अंग म्हणजे कामगार चळवळ होय. ते मजुरमंत्री होण्यापुर्वी व मजुरमंत्री झाल्यावर कामगारांच्या ज्या चळवळी राबवल्या त्याला न्याय देण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात केला जाणार आहे.

भारतात जसजसा औद्योगिक विकास होत गेला तसतसा कामगार वर्गही उदयास आला. मालक-कामगार तंटे होवू लागले. खेडयातील जनता शहराकडे धावल्याने कामगारांची उपलब्धता मुबलक झाली. म्हणूनच कामगारांना यंत्राहूनही कमी दर्जा प्राप्त झाला. म्हणजे याचा अर्थ असा की, जर यंत्र बंद पडले तर काम थांबते, त्याला दुरुस्त करण्यासाठी खर्च येतो हे खरे पण कामगार मेला तर त्याच्या ठिकाणी दुसरा कामगार कुठलाही खर्च न करता घेता येतो. यामुळेच कारखानदार श्रीमंत होत गेले आणि कामगार दयनीय होत गेले.

पिचलेला कामगार - कामगाराची अवस्था फारच हालाखीची होती. त्यांना आरोग्याविषयक सुविधा नव्हत्या. काम करुन थकल्यानंतर विश्रांती गृहे नव्हती, न्हानीघरे, संडास, मुता-या, उपहारगृहे जेवणाकरिता जागादेखील नव्हती, अपघात विमा नव्हता, कामाचे तास ठरलेले नव्हते ज्यादा श्रमाचा मोबदला नव्हता, बालकामगाराची समस्या होती, स्त्री कामगारांची समस्या होती. १९०८ पर्यंत कारखान्यातील कामगारांना दररोज जवळजवळ १५ तास काम करावे लागत होते. [१]

थोडक्यात कामगार म्हणजे द्रव्यरुपाने वा वस्तुरूपाने मिळणा-या मोबदल्यात शारिरिक वा मानसिक श्रम करणा-या प्रत्येक व्यक्तीला कामगार अशी संज्ञा देता येईल. [२] म्हणजेच श्रम विकून त्यांच्या मोबदल्यात वेतन घेणारा वर्ग म्हणजे कामगार होय. मग तो भुमीहीन मजुर असो किंवा कारखान्यात काम करणारा असो किंवा वरिष्ठ श्रेणीचा पांढरपेशा नोकरदार वर्गही असो. हे सर्वजण आपले शारिरिक किंवा मानसिक श्रम विकुनच मोबदला घेत असतात. ते सर्वजण कामगारच असतात. अशा सर्वच वर्गासाठी बाबासाहेबांनी खुप मोठा लढा दिला आहे.

भारतातील कामगारांची लोकसंख्या - यावेळी भारतात कामगारांची लोकसंख्या खुप मोठी होती. लॉर्ड चेम्सफर्ड याने ऑक्टोबर १९२२ मध्ये कॉन्सिल ऑफ दि लीग ऑफ नेशन्स समोर भाषण करताना सांगितले होते की, यावेळी भारतात मजुरांची संख्या दोन कोटी होती. [३] १९२७-२८ मध्ये बिटिश ट्रेड युनियन काँग्रेसचे शिष्टमंडळ भारतात आले होते. त्यांनीही कामगारांची लोकसंख्या अडीच कोटीच्या वर जाईल असा अंदाज व्यक्त केला होता. पैकी दोनशे पंधरा लक्ष कामगार हे शेतक-यांपैकी श्रमजीवी वर्गातील होते. [४]

१९३१ च्या जनगणनेनुसार ब्रिटिश इंडियाच्या फॅक्टरी ॲक्ट लागू असणा-या कारखान्यात मजुर म्हणून काम करणा-यांची संख्या १५५३१६९ एवढी होती. [५] इंडियन फ्रॅनचाइजे कमिटीच्या सांख्यकिप्रमाणे १९३१ साली कामगारांची संख्या ५ कोटी पासस्ट लाख होती. [६] शेतीवर काम करणा-यांची संख्या १९२१ साली २१.४ दशलक्ष होती. तर १९३१ मध्ये ३१.५ दशलक्ष होती. इंडस्ट्रीयल लेबद इन इंडियाच्या अहवालानुसार १९३८ साली ३६ टक्के लोक निरनिराळ्या धंद्यात व पोटासाठी मजुरी करुन जगत होते. भारतात कामगारांची लोकसंख्या नेमकी किती होती हे जरी ठामपणे सांगता येत नसले तरी शेतमजुर, कारखान्यातील कामगार, खाणकामगार यामध्ये ही संख्या विखुरलेली होती. या सर्वांचे जीवनमान उंचावण्यासाठी पहिल्यांदा आवाज उठवला तो नारायण मेघाजी लोखंडे यांनी होय. नारायण मेघाजी लोखंडे यांनी १८९० मध्ये मुंबई गिरणी कामगार संघ स्थापन केला. या संघटनेने खुप चांगले काम केले. पुढे वेगवेगळ्या कामगार संघटना अस्तित्वात आल्या परंतू या संघटना इंग्रज व भांडवलधार्जिन्या असल्याने कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडण्याचे पध्दतशीरपणे नाकारले होते. [७] परंतू पुढे श्रमिकांविषयी



Scanned by CamScanner

ISBN No.: 978-1-62951-322-5


तळमळ असणारे आणि कामगारांच्या ऐक्याचा पुरस्कार करणारे, कम्युनिस्ट विचारसरणीचे गाढे अभ्यासक डॉ. आंबेडकरांनी कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आणि त्यांना न्याय देण्यासाठीच १५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजुर पक्षाची स्थापना केली. [८] डॉ. आंबेडकरांनी हा पक्ष केवळ मजुर वर्गाच्या कल्याणासाठीच स्थापन केलेला होता. आणि म्हणूनच त्यांनी दलित वर्ग या शब्दाऐवजी मजुर हा शब्द वापरला होता. त्यांना वाटत होते मजुर वर्गात दलितही येतात. २२ ऑगस्ट १९३६ च्या जनता या मुखपत्राच्या संपादकीयात त्यांनी म्हटले आहे की, अस्पृश्यता निवारणाऱ्या लढ्याचे बाह्य स्वरुप जरी जातीनिष्ठ वाटत असले तरी तो लढा आर्थिक आहे. आणि या आर्थिक लढ्यात स्पृश्य आणि अस्पृश्य शेतकरी, कामकरी वर्गाचे हितसंबंध एकजीव आहेत. [९] डॉ. आंबेडकरांची धारणा अशी होती की, गरीबांचा पक्ष गरीबांनीच चालवला पाहिजे. म्हणूनच आपल्या स्वतंत्र मजुर पक्षामध्ये कायस्थ , बहुजन समाज, मराठी वर्ग वगैरे जातींचाही समावेश होता. याचा अर्थ डॉ. आंबेटकरांनी मजुरांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठीच हा पक्ष स्थापन केला होता. म्हणूनच त्यांना भारतीय कामगार मसिहा समजतात. [१०] डॉ. आंबेडकरांनी ज्याच्या माध्यमातून आपली कामगार चळवळ राबवली त्या स्वतंत्र मजुर पक्षाची ध्येये धोरणे व उधिष्टचे पाहिल्यावर आंबेडकरांची तळमळ आपल्या लक्षात येईल.

१) कामगारांच्या कामाचे तास कमी करुन मजुरीची किमान मर्यादा ठरविणे.
२) कारखान्यातील व गिरण्यातील कामगारांच्या नोकरीची शाश्वती व बढती याबाबत कायदेशीर तरतुद करणे.
३) केलेल्या कामाचे योग्य वेतन दिले पाहिजे.
४) कामगारांना राहण्यासाठी स्वस्तात घरे देणे.
५) कामगारांच्या आरोग्याची काळजी घेवून त्यांना आजारी रजा देणे.
६) अपघाती नुकसान भरपाई देवून वृध्दत्वाचे पेन्शनही दिले पाहीजे.
७) कामगारांच्या मुलांसाठी शैक्षणिक सुविधा निर्माण करणे.

डॉ. आंबेडकरांनी अशा प्रकारची ध्येये आपल्या पक्षाची जाहीर करुन कामगारांच्या कल्याणाचा विचार केला आहे. डॉ. आंबेडकरांना वाटत होते की, कम्युनिस्ट पक्ष हा सकृतदर्शनी जरी कामगारांच्या हितांसाठी लढतो आहे असे वाटत असले तरी त्यांची धोरणे अत्यंत ढोंगीपणाची वाटत आहेत. तोंडी साम्यवाद व आचरणात जातीवाद असे त्यांचे स्वरुप हे कामगार चळवळीला मारक आहे.

### बहिष्कृत कामगारांच्या प्रश्नांविषयी.

बाबासाहेबांनी भारतीय कामगारांच्या हक्कांसाठी आयुष्यभर लढा दिला. त्यासाठीच त्यांनी स्वतंत्र मजुर पक्ष स्थापन केला होता. मुंबईतील गिरणीकामगारांचा पहिला मोठा संप १९२८ साली झाला. [११] संपाचे कारण होते कापड गिरणीतील स्पृश्य कामगार अस्पृश्य वर्गातील कामगारांबरोबर काम करण्यास तयार नव्हते. यावर मुंबई सरकारने मुंबई हायकोर्टाचे जज्ज (अध्यक्ष) आणि मि. एम.पी. खारेगाट व बाळकृष्ण सीताराम कामत यांची कमिटी नेमली. या कमिटीने बहिष्कृत वर्गाला कापड खात्यात साच्यावर काम करण्याची परवानगी दिली. [१२] डॉ. बाबासाहेबांना वाटत होते की, जगातले सारे कामगार एक आहेत. ही घोषणा केवळ पोकळ आहे व्यवहारात मात्र प्रत्यक्ष स्पृश्य-अस्पृश्य असा भेद केला जात होता. [१३] म्हणूनच दलित कामगारांनी स्वतंत्र संघटना उभारावी असे त्यांना वाटत होते.

### कामगारांनी संप करणे स्वातंत्याचा हक्क आहे.

इ.स. १९३८ मध्ये मुंबई राज्याचे तत्कालिन मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी औद्योगिक कलहाविषयीचे विधेयक मांडले. या विधेयकामध्ये त्यांनी संप करणे हा हक्कच मुळी कुणालाही असू शकत नाही. त्यांना संप करण्याचा हक्क नसल्यामुळे त्याबद्दल त्यांना शिक्षा करणे ही गोष्ट नीतीच्या अगर कायद्याच्या विरुध्द नाही. अशी विधाने केली होती. [१४] डॉ. बाबासाहेब हे विधिमंडळाचे सदस्य असल्याने त्यांनी यावर घणाघाती हल्ला केला. ते म्हणाले संप म्हणजे स्वातंत्र्याचा हक्क आहे. संप म्हणजे नोकरीच्या कॉन्ट्रॅक्टचा भंग. हा भंग म्हणजे दिवाणी स्वरुपाचा गुन्हा असू शकेल. [१५] नुकसान करणे हा संपवाल्याचा कधीच हेतू नसतो. आपल्या मागण्या मिळविण्याच्या हेतूनेच संप करण्यात येतो. [१६] एखाद्याला त्याच्या मनाविरुध्द नोकरी करावयास



Scanned by CamScanner

लावणे म्हणजे त्याला गुलाम बनवणे होय. आणि हे नितितत्वाच्या विरूध्द आहे. आणि म्हणून या बिलाला त्यांनी कामगारांचे नागरी स्वातंत्र्य हिरावून घेणारा कायदा असे म्हटले आहे. हे विधेयक प्रतिगामी, वाईट, पाशवी असून लोकशाहीची थट्टा करणारे आहे. [17] अशी जळजळीत टीका करून कामगारांच्या न्याय्य हक्काला वाचा फोडण्याचे काम केले आहे. डॉ. आंबेडकर यांनी विधेयकावर केवळ टिका करून थांबले नाहीत तर सर्व कामगारांनी याचा निषेध करावा म्हणून स्वतंत्र मजुर पक्ष व ट्रेड युनिक कॉंग्रेसतर्फे बॅ. जमनादास मेहता यांच्या अध्यक्षतेखाली कामगारांची एक संयुक्त परिषद तरळच्या कामगार मैदानावर भरवली यामध्ये साठ कामगार संघटनांनी भाग घेतला होता. या सभेला संबोधित करताना डॉ. आंबेडकर म्हणाले मुंबई सरकारने केवळ मालकांना खुश करण्यासाठी सदर बील पास करून कामगारांची एक प्रकारे कत्तल केली आहे. याचा निषेध म्हणून नोव्हें १९३८ हा संपाचा दिवस ठरवलाज यामध्ये सर्व कामगारांऐवजी व मजूरांनी सहभागी होऊन आपल्या विराट शक्तीचे प्रदर्शन जगाला दाखवून दिले होते. [18] यावेळी कामगारांचा बालेकिल्ला डीलाईट रोड येथे कामगार व पोलीस अधिकाऱ्यात चकमकी उडाल्या. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात ७२ लोक जखमी झाले तर ३५ लोकांना अटक झाली. [19] या संपाचे लोण अहमदाबाद, अंमळनेर, जळगाव, चाळीसगाव, पुणे, धुळयापर्यंत पसरले होते. यावरून लक्षात येते की, डॉ. आंबेडकर हे प्रथम श्रेणीचे कामगार नेते होते.

शेतकरी व शेतमजुरांचे नेते

डॉ. आंबेडकर हे केवळ कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांसाठीच लढा देत होते असे नव्हते तर शेतकरी आणि शेतमजुर यांच्यासाठीही ते लढत होते. यावेळी कोकणात अस्तित्वात असलेल्या खोता विरूध्द आवाज उठविला. खोत हा सुलतानासारखाच वागत होता. खोत हा सावकार असून गावातील शेतकऱ्यांना वाट्टेल तसे पिळून काढीत असे. शेतकऱ्यांच्या मुलाने शिकू नये, चांगली कपडे वापरु नये, कुणब्याच्या बायकोने विशिष्ट पध्दतीचेच लुगडे नेसावे अशी सक्ती होते. थोडक्यात खोती म्हणजे शेतकरी व शेतमजुरांची गुलामगीरीच होती. याविरूध्द आवाज उठविण्यासाठी १४ एप्रिल १९२९ रोजी चिपळूणला शेतकरी परिषद भरवली. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. आंबेडकरांनी सभेला संबोधित करताना म्हटले की, शेतकरी वर्ग आज खोती पध्दतीमुळे गुलामगिरीत खितपत पडला आहे. या अन्यायाच्या चौकटीवर कोणत्याही समाजात स्वास्थ्य होणार नाही. शांतता टिकवायची असेल तर सरकारने न्याय दिला पाहिजे. कुणबी लोकांनी आपल्या स्वाभिमानाला जागून वरिष्ठ लोकांची हलकीसलकी कामे करून स्वतःचा सामाजिक दर्जा मुळीच कमी घेवू नये. [20] या परिषदेने पुढीलप्रमाणे ठराव पास केले होते.

खोतीपध्दत ही गुलामगिरी आहे. खोतामुळे शेतकरी वर्ग खोताचा ताबेदार झाला आहे. आर्थिकदृष्ट्या खोतपध्दत कुळांना घातक आहे. नैतिकदृष्ट्या खोतपध्दत घातक आहे. अशा या खोत पध्दतीची ही परिषद तिव्र निषेध करते व ती नाहीशी करावी अशी सरकारास आग्रहाची सुचना करते. [21] या ठरावाची लवकरात लवकर अंमलबजावणी व्हावी यासाठी १० जानेवारी १९३८ रोजी स्वतंत्र मजुर पक्षाने डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली २० हजार शेतकऱ्यांचा विधानमंडळावर मोर्चा नेला होता. त्यांनी केलेल्या मागण्या फार महत्त्वाच्या होत्या त्या पुढीलप्रमाणे.

१) जमीन कसणाऱ्याला त्याच्या मेहनीतीचे फळ मिळावे. २) खोत इनामदारासारखे मध्यस्थ नको. ३) कमी उत्पन्नावर सारा माफ करावा. ४) खोती व इनामदार पध्दती कायद्याने नष्ट करावी. ५) तीन वर्षे जमिन कसणाऱ्या कुळाला कायम कुळ समजले जावे. ६) सावकारांवर नियंत्रण ठेवणे.

७) वेठबिगार हा फौजदारी गुन्हा ठरविणे. [22] थोडक्यात अशा मागण्या करुन डॉ. आंबेडकरांनी श्रमजीवी वर्गाचा आवाज बुलंद केला.

मनमाडच्या रेल्वे कामगार परिषदेला मार्गदर्शन.

रेल्वे कामगारांचे जीवन फारच हालाखीचे होते. डॉ. आंबेडकरांनी रेल्वे कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी १२ व १३ फेब्रुवारी १९३८ रोजी मनमाड येथे २० हजार रेल्वे कामगारांची परिषद भरवली. यावेळी ते म्हणाले मजुरांच्या संघटनेचे दोन शत्रू आहेत. एक म्हणजे ब्राह्मणशाही व दुसरा म्हणजे भांडवलशाही. ब्राह्मणशाही जातीजातीत कामगारांना फोडते. ब्राह्मणशाही म्हणजे ब्राह्मण वर्ग नव्हे तर समता, ऐक्य व बंधुत्व या तत्वांना काळे फासणारे मन होय. [23] दुसरा शत्रू म्हणजे भांडवलशाही, की जो नफ्याच्या मागे लागून कामगारांचे रक्त शोषुन घेतो. तेव्हा या शत्रूची पाळेमुळे कामगारांनी खोदून काढली पाहिजेत. [24] ते पुढे म्हणतात. कामगारांनी आपल्या हितासाठी आणि आपल्या संरक्षणासाठी राजकारणात शिरलेच पाहिजे. त्याशिवाय कामगार सुधारणा शक्य नाही. म्हणून तळागाळातील सर्व कामगारांचे ऐक्य व्हावे व

Scanned by CamScanner

ISBN No.: 978-1-62951-322-5


त्यांनी देशाच्या राजकारणात भाग घ्यावा असे मला वाटते. [२५] थोडक्यात राजकारणात आल्याशिवाय कामगारांची गुलामगिरी संपणार नाही असे डॉ. आंबेडकरांना वाटत होत.

मजुरमंत्री असताना केलेले कार्य.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महाराज्यपालांच्या मंत्रीमंडळात २० जुलै १९४२ रोजी मजुरमंत्री म्हणून सुत्रे स्विकारली. त्यांनी श्रमिकांचा संरक्षक व उध्दारक म्हणून खुप महत्वाची भुमिका बजावली आहे. त्यांनी कामगारावर होणारा अन्याय दूर व्हावा यासाठी इंडियन लेबर कॉन्सिल निर्माण केले. [२६] त्यामध्ये कामगार, मालक व सरकार यांचा समावेश होता. यालाच त्रिपक्ष कामगार परिषद असे म्हणतात. दि. ६ व ७ ऑगस्ट १९४५ रोजी भरलेल्या परिषदेचे उद्घाटन करताना डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, मालक व मजुर यांची तीन समान उद्दीष्टे आहेत. १) मजुराविषयक कायदा करणे. २) औद्योगिक कलह सोडविणे. ३) मालक-मजुर यांच्या प्रश्नांविषयी चर्चा करणे. [२७] थोडक्यात मालक व कामगार यांच्यामध्ये सौहार्दाचे वातावरण कसे राहील हे डॉ. आंबेडकरांनी पाहीले होते.

स्त्री खाणकामगाराविषयी घेतलेले निर्णय.

डॉ. आंबेडकरांनी सर्वच कामगारांच्या जीवनातील प्रश्न समजून घेतले होते. म्हणूनच मजुरमंत्री असताना त्यांना स्त्री खाणकामगाराविषयी एक विधेयक मांडले. त्यांनी बाळंतपणापुर्वीच्या चार आठवड्यांच्या काळात तिला प्रसुती भत्ता मिळण्याचा हक्क राहील असा कायदा केला.

१९३८ च्या पुर्वी कोळसा खाणीमध्ये काम करणाऱ्या स्त्रीला पुरुष कामगाराएवढा पगार दिला जात नसे. परंतु यापुढे तो दिला जाईल असे घोषीत केले. स्त्री कामगारांना प्रसूतीचे फायदे देताना मजुरमंत्री म्हणून डॉ. आंबेडकरांनी काही तरतुदी केल्या.

१) कोणत्याही स्त्रीला प्रसुतीपुर्व दहा आठवडे भूगर्भातील काम करण्यास परवानगी नाकारली.

२) प्रसुतीनंतर तीने चार आठवडे पुर्ण विश्रांती घ्यावी. [२८]

३) या चौदा आठवड्याच्या काळात दिवसाला बारा आणे याप्रमाणे मोबदला दिला जाईल.

थोडक्यात डॉ. आंबेडकरांनी भारतीय स्त्रीयांच्या प्रश्नाला वाचा फोडून देण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ. आंबेडकरांनी कामगारांना पुर्ण पगारी सुट्टया देण्याचे दुरुस्ती विधेयक तयार केले होते. कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी लवाद लादणे कामगारांच्या हिताचे आहे. कामगार संहितेचा भाग म्हणून ते उपयोगात यावे अशी त्यांची कल्पना होती. [२९]

डॉ. आंबेडकरांनी केवळ कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचाच विचार केला आहे असे नव्हे तर शेतीवर काम करणाऱ्या कामगारांचेही प्रश्न त्यांना सतावत होते. कामाचे तास, प्रॉव्हीडंट फंड, आरोग्यविषयक विमा, मालकाची असणारी जबाबदारी, नुकसान भरपाई असे कायदे ज्याप्रमाणे औद्योगिक कामगारांना लागू आहेत त्याप्रमाणे शेतीवर राबणाऱ्या कामगारांनाही ते लागू करावेत असे त्यांना वाटत होते. [३०] डॉ. आंबेडकरांनी कामगारांच्याबाबत जे काम केले आहे त्यामुळे त्यांच्या जीवनात प्रकाश आला आहे. कामगारांना मिळणाऱ्या आजच्या हक्कामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मजुरमंत्री म्हणून सिंहाचा वाटा आहे हे शत्रूलादेखील मान्य करावे लागेल.



Scanned by CamScanner

ISBN No.: 978-1-62951-322-5

RADHEYA PUBLICATION



Scanned by CamScanner